# नि. ५८ वरील आदेश.

( गणेश पाष्टे –अपीलकार वि. शशिकांत बांदेकर –उत्तरवादी )

१. प्रस्तुतचा अर्ज अपीलकार यांनी नि.क्र.५६ वर दि.१६/०१/२०२६ रोजी पारित केलेला स्थगिती आदेश पुढे चालू ठेवणेसाठी दाखल केलेला आहे.

२. उत्तरवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. सबब, अर्ज विना म्हणणे चालविणेत येत आहे.

३. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकार यांनी नियमित दिवाणी दावा क्र. ४४/२००८ चे न्यायनिर्णय व हुकूमनाम्याविरुध्द प्रस्तुतचे अपील दाखल केले आहे. प्रस्तुतचा दावा कब्जासाठी व दावा मिळकतीच्या वाटपासाठी दाखल केला होता. त्यामुळे दि. १६/०१/२०२६ रोजी नि.क्र.५६ वर हुकूनाम्याच्या अंमलबजावणीस स्थगितीचा पारित केलेला आदेश हा पुढे चालू ठेवला नाही तर सदर अपिलाचे स्वारस्य संपुष्टात येणार आहे. त्यामुळे नि.क्र.५६ वरील स्थगिती आदेश पुढे चालू ठेवणे न्यायोचित वाटते. सबब, नि.क्र.५६ वर पारित केलेला स्थगिती आदेश पुढील तारीखपर्यंत वाढविणेत येत आहे.

Digitally signed by DESHMUKH VIDYA SHARADRAO
Date: 2026.03.13 18:21:00 +0530

सिंधुदुर्ग –ओरोस
दि.१३/०३/२०२६

(व्ही.एस.देशमुख)
जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग –ओरोस.